नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८९ Issue - 89 | वार शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५३ Blow- Friday Date 15 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य गाजवणाऱ्या जवानांचा होणार सन्मान

ऑपरेशन सिंदूरमधील ९ जवानांना वीर चक्र

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली: भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा सर्वत्र उत्साह आहे. ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं ऑपरेशन सिंदूरचं यश साजरं करण्यात येणार आहे. भारताच्या सैन्यदलांकडून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आलं होतं. या ऑपरेशन सिंदूरमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या वायूदलाच्या ९ वीरांचा वीर चक्र देऊन सन्मान केला जाणार आहे. याशिवाय ७ जवानांना सर्वोत्तम युद्ध सेवा पदक पुरस्कार दिला जाणार आहे.

हवाई दलानं पहिल्यांदा मिळवलं सर्वोत्तम युद्ध सेवा पदक

पहिल्यांदा हवाई दलाला सर्वोत्तम युद्ध सेवा पदकानं सन्मानित केलं जाणार आहे. भारतीय हवाई दलाच्या अधिकाऱ्यांची संख्या दुसऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा अधिक आहे. भारतीय हवाई दलानं शौर्य दाखवत पाकिस्तान जात दहशतवादी ठिकाणांवर हल्ले करत बदला घेतला होता.

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताची ताकद दाखवून देणाऱ्या लढाऊ विमानांच्या पायलटस नऊ भारतीय वायू सेनेच्या अधिकाऱ्यांना वीर चक्रान सन्मानित केलं जाणार आहे. वीर चक्र हे युद्धकाळातील शौर्यासाठी दिला जाणारं तिसऱ्या क्रमांकाचं सर्वोच्च पदक आहे. वीर चक्र पुरस्कार ग्रुप कॅप्टन रणजित सिंग सिद्धू, ग्रुप कॅप्टन मनीष अरोरा, ग्रुप कॅप्टन अनिमेष पटनी, ग्रुप कॅप्टन कुणाल कालरा, विंग कमांडर जॉय चंद्र, स्क्वाड्रन लीडर सार्थक कुमार,स्क्वाड्रन लीडर सिद्धांत सिंग, स्क्वाड्रन लीडर रिझवान मलिक, फ्लाइट लेफ्टनंट अर्शवीर सिंग ठाकूर यांना दिला जाणार आहे.

सर्वोत्तम युद्ध सेवा पदक

१. लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा, जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, नॉर्दर्न कमान २. लेफ्टनंट जनरल राजीव घई, महानिदेशक सैन्य अभियान ३. वाइस एडमिरल संजय जसजीत सिंह (सेवानिवृत्त) - पश्चिम नौदल कमानचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ ४. एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी, हवाई दल उप प्रमुख ५. एअर मार्शल नागेश कपूर - दक्षिण हवाई कमानचे एओसी-इन-चीफ ६. एअर मार्शल जीतेंद्र मिश्रा - पश्चिम हवाई कमानचे एओसी-इन-चीफ ७. एअर मार्शल एके भारती - डीजीएओ

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात सैन्यदलांना दिली जाणारं पदकं

सर्वोत्तम युद्ध सेवा पदक - २ कीर्ती चक्र - ४ उत्तम युद्ध सेवा पदक - ३ वीर चक्र - ४ शौर्य चक्र- ८ युद्ध सेवा पदक - ९ बार टू सेना मेडल - २ वायु सेना मेडल - २६ सेना मेडल - ५८

अन्यथा मोठी किंमत चुकवावी लागेल; भारताचा पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पाकिस्तानकडून सुरू असलेल्या भडकाऊ आणि युद्धछेडीच्या वक्तव्यांवर भारताने गुरुवारी कडक शब्दात प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने आपल्या वक्तव्यावर नियंत्रण ठेवावे, तसेच नको ते धाडस करू नये, अन्यथा त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल असा कडक इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. भारताचा हा इशारा पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या वक्तव्यांनंतर देण्यात आला. शरीफ यांनी दोन दिवसांपूर्वी म्हटले होते, की, भारत आमचं पाणी अडवणार असेल तर त्याला योग्य तो धडा शिकवला जाईल.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जण ठार झाल्यानंतर भारताने २३ एप्रिल रोजी सिंधू पाणी वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही अशी भारताने भूमिका घेतली. त्यावर पाण्याचा प्रवाह रोखणे म्हणजे युद्ध समजले जाईल, असं वक्तव्य पाकिस्तानने केलं होतं.



पाकिस्तानची भाषा युद्धखोरीची

पाकचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो-झरदारी यांनी या निर्णयाची तुलना 'सिंधू संस्कृतीवर हल्ला' असा करत पाकिस्तान युद्धाला तयार असल्याचा इशारा दिला होता. या वादात भाजप नेते आणि अभिनेते मिथुन चक्रवर्तीही उतरले. भारत ब्रह्मोस क्षेपणास्त्रांने पाकिस्तानला उत्तर देईल अशा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, पाकिस्तानी सैन्यप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी अमेरिकेतल्या टॅम्पा, फ्लोरिडा येथील कार्यक्रमात म्हटले होते की, भारत पाणी अडवण्यासाठी धरण बांधल्यास ते आम्ही नष्ट करू. सिंधू नदी ही भारताची कौटुंबिक मालमत्ता नाही.

भारतानं मुनीर यांच्या वक्तव्यावर टीका करत त्याला 'अण्वस्त्रांची धमकी देण्याचा प्रयत्न'असल्याचा दावा केला. तसेच भारताने पाकिस्तानच्या आण्विक कमांडच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अमेरिकेच्या भूमीवरुन पाकिस्ताने युद्धाची भाषा केली असं सांगत भारताने नाराजी व्यक्त केली.

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान आणि पीओकेतील दहशतवादी ठिकाणांवर भारताने कारवाई केली होती. त्यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले गेल्यानंतर १० मे रोजी दोन्ही देशांनी संघर्ष थांबवण्याचा निर्णय घेतला.

संपादकीय....

सडेतोड उत्तर

पाकिस्तानकडून सुरू असलेल्या भडकाऊ आणि युद्धछेडीच्या वक्तव्यांवर भारताने गुरुवारी कडक शब्दात प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने आपल्या वक्तव्यावर नियंत्रण ठेवावे, तसेच नको ते धाडस करू नये, अन्यथा त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल असा कडक इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. भारताचा हा इशारा पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या वक्तव्यांनंतर देण्यात आला. शरीफ यांनी दोन दिवसांपूर्वी म्हटले होते, की, भारत आमचं पाणी अडवणार असेल तर त्याला योग्य तो धडा शिकवला जाईल. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जण ठार झाल्यानंतर भारताने २३ एप्रिल रोजी सिंधू पाणी वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही अशी भारताने भूमिका घेतली. त्यावर पाण्याचा प्रवाह रोखणे म्हणजे युद्ध समजले जाईल, असं वक्तव्य पाकिस्तानने केलं होतं. पाकचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो-झरदारी यांनी या निर्णयाची तुलना 'सिंधू संस्कृतीवर हल्ला' असा करत पाकिस्तान युद्धाला तयार असल्याचा इशारा दिला होता. या वादात भाजप नेते आणि अभिनेते मिथुन चक्रवर्तीही उतरले. भारत ब्रह्मोस क्षेपणास्त्रांने पाकिस्तानला उत्तर देईल अशा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, पाकिस्तानी सैन्यप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी अमेरिकेतल्या टॅम्पा, फ्लोरिडा येथील कार्यक्रमात म्हटले होते की, भारत पाणी अडवण्यासाठी धरण बांधल्यास ते आम्ही नष्ट करू. सिंधू नदी ही भारताची कौटुंबिक मालमत्ता नाही. भारतानं मुनीर यांच्या वक्तव्यावर टीका करत त्याला 'अण्वस्त्रांची धमकी देण्याचा प्रयत्न'असल्याचा दावा केला.

किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी केल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या दरम्यान होमकर नगर येथे घडली.याप्रकरणी युवराज विष्णू भोसले (वय-३४,रा.भवानी पेठ,मड्डी वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सिद्धांत सारडा त्यांचे वडील व भाऊ (रा. होमकर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व त्यांचे कामगार हे वरील ठिकाणी अपार्टमेंटचे काम करण्यासाठी आले असता,त्या ठिकाणी वरील संशयित आरोपी यांच्या तीन चार चाकी गाड्या लावल्या असल्याने बांधकाम करायचे आहे.गाड्या काढून घ्या नुकसान होईल.असे म्हणाले,त्यावेळी वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करत वडील व भाऊ तेथे आले व तेही शिवीगाळ करून हातोडी घेऊन फिर्यादी यांच्या पाठीत मारहाण केली. पुढील तपास मपोसई.शेख या करीत आहेत.

माणसाने माणसाशी सौख्याने वागावे !

आपल्या प्रिय भारत देशाला इंग्रजी राजवटीच्या पारतंत्र्यातून १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला पवित्रतेचे श्रेय मिळाले. ती आजपावेतो आपण जोपासुन इतिहासातील पवित्र घटनांची स्मृती कायम ठेवूनच आज आपण देशात ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिना निमित्त आम्ही भारतीय आहोत याबाबत आम्हाला आत्मविश्वासच नाहीतर अभिमान आहेच. भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात आम्ही भारतीय आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तो टिकवून ठेवण्याची गरज आज भासू लागली आहे, कारण देश ढासळू पाहत आहे.

भारतीय स्वातंत्र्याची मुर्हुतमेढ १८५७ मध्येच रोवल्या गेलेली होती. या मुहुर्तमेढीवर भारतीय तिरंगा फडकविण्यास ९० वर्षाचा कालावधी लागला. या कालावधीत ही मुर्हुतमेढ अधिक सक्षम करण्यासाठी थोर क्रांतीकारकांचे बलिदान तसेच थोर नेत्यांची विचारसरणी व परिकाष्ठा लाभलेली आहे. तसेच या थोर नेत्यांची दिर्घ परंपरा सुध्दा या देशाच्या अस्तित्वाची साक्ष देते. या स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनी अशा थोर नेत्यांचे स्मरण करुन त्यांच्या प्रती नतमस्तक होणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. या शुभदिनी आम्ही शपथपुर्वक संकल्प केला पाहिजे की, आमच्या देशाच्या स्वातंत्र्याची सुरक्षा करणे हे आमचे एकमेव ध्येय आहे व त्याकरिता आम्हाला निरंतर जागरुक राहण्याची गरज आहे. आम्हा भारतीयांना मान नाही पण विदेशी माणसांना आमुच्या देशात फार मानानं सन्मानानी वागवलं जातं, ठिक आहे. तरी आम्ही ही शेवटी माणसं आहोत, याची जाणीव देखील येथील व्यवस्थेने ठेवावी. माणसा-माणसांत वितंडवाद होता कामा नये, ही खबरदारी शासनाची आहे.

भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणुन त्यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले 'जन गण मन' हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले. भारतीय संविधानामुळेच देशाची प्रगत राष्ट्रामध्ये मान उंचावत आहे. तेव्हा संविधानाचा अवमान होता कामा नये, याची दक्षता सरकारने काटेकोरपणे घेण्याची गरज आहे, कारण सध्या तरी संविधानाचा अवमान होत असल्याच्या घटना देशात घडत असतांना शासन हातवारे करीत आहे, असं होता कामा नये. जर असं घडलंच तर त्या व्यक्तिचं नागरिकत्व खलास करण्याची तरतूद करुन त्याला दंडीत केले पाहिजे.

हा ७८ वा स्वातंत्रदिन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव्या भारतास घटना समर्पीत केली, तो आम्हाला भारतीय असण्याचा अभिमान आहे. पं. जवाहरलाल नेहरुंनी आराम हराम आहे हा मंत्र दिला, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवीली तर लाल बहादुर शास्त्रींनी जयजवान, जयकिसान चा नारा देत ताश्कंद करार केला. प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांनी राजे व महाराजे यांचे तनखे बंद केले, बँकाचे राष्ट्रीयकरण केले. तसेच गरीबी हटाव चा नारा दिला २० कलमी कार्यक्रम देशभर लागू करुन देशाला, अर्थव्यवस्थेला नविन आयाम देवून या देशात सामाजिक क्रांती घडविली आणि युवा नेते राजीव गांधी यांनी २१ व्या शतकातील माहिती आणि तंत्रज्ञान असा भारत निर्माण करण्यास समर्थपणे पावले उचललीत. १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य मिळाले मात्र सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय खऱ्या अर्थाने सुराज्य निर्माण करता येणे शक्य नव्हते. हा धागा पकडून विकासाच्या अनेक योजना जाणीवपूर्वक राबविण्यात आल्या. समाजातील तळागाळातील लोकांची प्रगती व विकास साधणे हा या मागील उद्देश होता. पण तो ही आजवर साध्य झालेला दिसत नाही, ही शोकांतिका म्हणावी लागेल.

भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. २६ जानेवारी १९५० रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो) भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते.

परंतू अशा विपरीत आर्थिक कालखंडात सुध्दा भारत देश वेगळा पर्याय ठरु शकतो, असा एकमत प्रवाह होता. योग्य वैधानिक व कर प्रणाली तसेच योग्य आर्थिक वातावरण उपलब्ध करुन दिल्यास भारत आणि भारतीय व्यवसाय जगातील उत्तमांपैकी एक होऊ शकतो आणि जग भारतात येण्याची इच्छा व्यक्त करेल, असा युक्तिवाद सुध्दा या विचारसरणीने केलेलाआहे. हे सर्व देशाचे माजी पंतप्रधान मा.डॉ. मनमोहन सिंग यांच्याआर्थिक निती मुळे घडू शकले, ज्याचा पाया या देशाचे दिवगंत पंतप्रधान युवा नेते राजीव गांधी यांनी रचला होता. ही वस्तूस्थिती नाकारता येणार नाही. पण याचा बाऊ केला जात आहे हे देशहिताच्या विरुध्द आहे, खऱ्याला खरं म्हटलं पाहिजे.

आज ग्रामीण भारताला एका मोठया आर्थिक तथा सामाजिक बदलाची गरज आहे. ज्यात शिक्षण, सुदृढ आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण विषयक, आर्थिक तसेच सामाजिक दर्जा सुधारणे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील उत्पादकता तसेच जीवनस्तर उंचावण्यास मदत होईल. सरकारने हे धोरण सक्तीने अंमलात आणले पाहिजे, तेव्हाच जीवनस्तर उंचावेल.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात. जन गण मन हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते.

इंग्रजांचा कावेबाजपणा ओळखणाऱ्या काहींनी त्यांच्या विरुध्द शस्त्र उगारले. १८५७ मधले स्वातंत्र्यसमर तात्या टोपे, झाशीची राणी, नानासाहेब पेशवे यांनी गाजवले. पुढे सशस्त्र उठाव करुन वासुदेव बळवंत फडके, क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरु, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू इत्यादींनी आपला निषेध शस्त्रांच्या उपयोगाने नोंदविला. काहींनी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या केली, सावरकर, धिंग्रा इत्यादींनी तसेच प्रयत्न केले. स्वातंत्र्यासाठी जसे माणसं शहीद झाली तशी वंशावरही संकटे आली. लोकजागृती झाली पण दडपली गेली रानडे, टिळक, गोखले, आगरकर यांनी लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य वापरुन इंग्रजांकडून होणारा अन्याय आणि जुलूम यांची जनतेला जाणीव करुन दिली. भारतीय समाजाला आपली स्थिती सुधारण्याची प्रेरणा दिली. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रयत्नाने जातीय भेदाभेद किती वाईट आणि त्यामुळे समाज कसा दुर्बल होतो हे लोकांच्या निर्दशनास आले.

बिझनेस कन्सर्न इन इंडिया या पाक्षिकामध्ये आम्हाला आमच्या देशाच्या इतिहासाचा थोर अभिमान आहे. आम्ही अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत स्वातंत्र्याची वाटचाल सुरु केली, परंतू इतर देशाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय व्यापार हाच आमच्याआजच्या भौतिक बदलास व आर्थिक स्वातंत्र्यास कारणीभुत असल्याचे आमचे ठाम मत आहे. आमच्या देशाच्या मागील २० वर्षाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास, आम्ही आमचा जलद आर्थीक विकासास या नविन शतकाच्या सुरुवाती पासूनच सुरुवात केल्याचे स्पष्ट जाणवते, पण तिथेही ठोस अशी पाऊले उचललीत नाही.

बहुसंख्य तरुण भारतीयांच्या मते जुनी आर्थिक विषमता कालबाहय झालेली असून येणाऱ्या भविष्यात आम्हाला मोठया सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना पार करावयाचे आहे. परंतू हे करतांना आम्हाला काही संकटांना समोरे जावेच लागेल, कारण पुढील १० वर्षे ही आताच्या काळापेक्षा सर्वदृष्टीने वेगळे असतील आणि आम्हाला या काळात यशस्वी होण्याकरीता आयुष्याच्या सर्वच क्षेत्रात व्यापार, खेळ, आंतरराष्ट्रीय घडामोडीवर मात करावी लागेल. त्यासाठी ठाम निर्णय घेण्याची गरज आहे, तोंडदेखलेपणा नको. ते आज देशात घडत आहे, हे थांबलं पाहिजे.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आज ७७ वर्ष पूर्ण होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची अन् आनंदाची बाब आहे. स्वातंत्र्य दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वजण कटिबध्द होऊ या. तेव्हाच देश अराजकतेकडे जाणार नाही आणि लोकशाही जिवंत राहिल, याचं भान असणं गरजेचं आहे. भारत माझा देश आहे आणि मी त्याचा मालक आहे हे आमच्या बापाने आम्हाला सांगितले आहे कोणाच्या सांगण्यावरुन आम्हाला आमची देशभक्ती सिध्द करुन दाखवायची गरज नाही. आमची देशभक्ती आमच्या रक्तात भिनलेली आहे आणि ती डोळस आहे. स्वातंत्र्य लढयात काडीचं ही योगदान नसणाऱ्या कुत्र्यांनी आम्हाला देशभक्ती शिकवू नये. देश हा माणसांनी निर्माण होतो म्हणुन देशातला प्रत्येक माणुस हा सुरक्षित असणं म्हणजे देश सुजलाम सुफलाम असणं होय! म्हणूनच माणसांनी माणसाशी सौख्याने वागावे. ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा!

मनोरुग्ण व्यक्तीची जिल्हा परिषद शाळेत पदोन्नती?

शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कायमस्वरूपी निलंबित करण्याची मागणी; बुलढाणा प्रभारी गट शिक्षण अधिकारी पंढरी मोरे यांचा पदभार काढण्याची ही मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील शैक्षणिक विभागात एकच खळबळ उडून देणारी घटना असून बुलढाणा जिल्ह्यातील चांडोळ येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत शिक्षक असलेले सचिन ताटू यांनी मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र बनवून घेऊन त्या प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना लाच देऊन त्यावर पांघरून घालून आतापर्यंत शिक्षक पदावरून मुख्याध्यापक पदावर पदोन्नती करून घेतल्याने शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे, विशेष म्हणजे प्रभारी गटशिक्षणाधिकारीचा पदभार असलेले पंढरी मोरे हे सुद्धा त्यांना पाठीशी घालत असल्याचा प्रकार समोर आला आहे,

याबाबत सविस्तर वृत्तांत असे की सिंदखेडराजा तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते गंगाराम उबाळे यांनी गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे दिनांक १० / ७ /२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे की चांडोळ येथील कार्यरत जिल्हा परिषद शिक्षक सचिन कल्याण सिंग ताटू हे मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे असून राजकीय लोकांचे पाठबळ पाठीशी असल्याचे भाषण आतापर्यंत अनेक योजना ते लाटत असून याच देवाण-घेवांच्या माध्यमातून त्यांनी आता जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पद सुद्धा मिळवले आहे, खरं म्हणजे खऱ्याखोऱ्या अपंग व्यक्तीला डावलून अनेक बनावट अपंग प्रमाणपत्र काढल्या जात आहे अनेक व्यक्ती शासनाचे दिशाभूल करून पगार लाटत आहे, मात्र येथे अपंग प्रमाणपत्र असलं तर हरकत नाही परंतु मानसिक रुग्ण वाचून शाळेतच पदोन्नती लाटण्याचा प्रकार घडल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे, खरं म्हणजे मानसिक रुग्ण असल्यामुळे त्यांना तातडीने निलंबित करणे गरजेचे असताना बुलढाणा प्रभारी गटशिक्षणाधिकारी असलेले पंढरी मोरे यांच्याकडे सदर तक्रारकर्ते गंगाराम उबाळे वारंवार तक्रारीचे काय झाले म्हणून विचारणा करत असताना मोरे हे उडवा उडवी चे उत्तर देतात अर्ज हरवला आहे बाबूजी ची बदली झाली आहे असे उत्तर ते देत असून त्यांना पाठीशी घालण्याचे काम ते करत आहे त्यामुळे मानसिक रुग्ण असलेले सचिन ताटू यांना कायमस्वरूपी निलंबित करण्यात यावे कारण मानसिक रुग्ण असल्यामुळे शाळेतील विद्यार्थिनी त्याचबरोबर विद्यार्थी यांच्यासोबत ते गैरप्रकार करू शकतात त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने निलंबित करावे व त्यांची संपूर्ण चौकशी करावी अशी मागणी सुद्धा उबाळे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे '

त्याचबरोबर पंढरी मोरे यांनी सुद्धा त्यांच्याकडे प्रभाव असताना स्थापना पदावर नेमणूक करण्यासाठी देवाणघेवाण करत असून त्यांचा प्रभार सुद्धा काढण्यात यावा अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.

मनोहर भोसले यांच्या 'मक्याची कणसं' कथासंग्रहाचे प्रकाशन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/प्रतिनिधी : सैनिक टाकळी ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील लेखक मनोहर भोसले यांच्या बहुचर्चीत 'मक्याची कणसं ' या कथासंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या 'किशोर ' मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते झाले. पुणे येथील कार्यालयात झालेल्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी कोल्हापूर जिल्ह्याच्या मराठी बालकुमार साहित्य सभेचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत पाटील होते. मनोहर भोसले यांचा इयत्ता ५ वी च्या बालभारती पाठ्यपुस्तकात 'कठीण समय येता 'या शीर्षकाचा पाठ आहे.'लेखक आपल्या भेटीला ' या उपक्रमाच्या माध्यमातून भोसले यांनी केलेल्या कार्याचे किरण केंद्रे यांनी कौतुक केले.यावेळी जेष्ठ साहित्यिक व प्रकाशक चंद्रकांत निकाडे,मुंबई येथील आदर्श शिक्षक सुनिल मस्कर,मराठी बालकुमार साहित्य सभेच्या कार्यकारणी सदस्या सौ.गीता पाटील इचलकरंजी आदीसह मान्यवर उपस्थित होते.

शिरवळवाडी साठवण तलाव भरले; आनंद तानवडे यांचे हस्ते जलपूजन संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : हणमंत घोदे शिरवळवाडी साठवण तलाव १००% भरले असून यामुळे तलाव लाभक्षेत्रातील गावांना याचा लाभ मोठया प्रमाणात होणार आहे २०१७-१८, २०१८-२०१९ मध्ये तलावातील अंदाजे १० हजार ब्रास गाळ शेतकरी यांनी स्व खर्चातून नेले होते त्यामुळे तलावाची खोली वाढली असल्याने तलावात पाणी साठवण वाढ होणार आहे . आज रोजी तलावात प्रकल्पिय पाणी साठा ३.२६ द.ल.घ. मीटर आहेत असे तलाव बिट धारक श्रीशैल पाटील यांनी सांगितले . तलाव भरल्यामुळे शिरवळवाडी, शिरवळ , वागदरी ,सदलापूर , कर्नाटक मधील हिरोळी ,सरसंबा या गावांना पाणी प्रश्न मिटणार आहेत.

तलाव १००% भरले असून मा श्री आनंद तानवडे यांचा हस्ते जलपूजन करण्यात आले यावेळी राजकुमार जवळगे ,विजयकुमार बिराजदार, अजित व्होदलूरे , चंद्रकांत दर्शनाले,धुळप्पा घोदे ,हणमंत घोदे , धानय्या स्वामी, प्रदीप वडगांव,शिवराज हत्तरकी, मारुती कोटगे, बसवराज सफले ,वीरेश बागेवाडी ,गजानन निंबाळे, संगप्पा कुडले उपस्थित होते

श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे विभाजन विभिक्षिका स्मृतिदिन साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे विभाजन विभिक्षिका स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

सदर विभाजन विभिक्षिका स्मृतिदिन कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे गटनिदेशक श्री गणेश काशीद सर होते सदर कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेचे शिल्प निदेशका सौ रेणुका गवल मॅडम यांनी केली प्रास्ताविकेमध्ये सदर विभाजन विभिक्षिका स्मृतिदिनाचे महत्त्व त्यांनी सांगितले त्यानंतर संस्थेचे ज्येष्ठ शिल्प निदेशक श्री विजय बोंगाळे सर यांनी विभिक्षिका या शब्दाचा अर्थ व त्याचे महत्त्व याचे स्मरण उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थ्यांना करून दिली सदर दिनाचे महत्त्व प्रमुख वक्ते ज्येष्ठ निदेशक श्री एमजी नदाफ सर यांनी सर्व प्रशिक्षणार्थी त्यांना समजावून सांगितले भारत देशाच्या विभाजना वेळी अनेक कुटुंबांचे अतोनात नुकसान झाले व अनेक कुटुंब उध्वस्त झाले कित्येक लाख लोकांचे यामध्ये बळी गेले व अनेक कुटुंबांचे विस्थापन झाले यावेळी नागरिकांना अनेक संघटना सामोरे जावे लागले हा दिवस अत्यंत दुःखदायक होता ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व जे लोक बळी ठरले त्यांची आठवण आज ताजी झाली सध्या भारत देशामध्ये राहणार नागरिकांना व जनतेला याची माहिती व आठवण व्हावी म्हणून हा दिवस १४ ऑगस्ट रोजी दरवर्षी आपण विभाजन विभिक्षिका स्मृतिदिन म्हणून साजरा केला पाहिजे असे या दिनाचे महत्त्व श्री नदाफ यांनी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थ्यांना करून दिली त्याचप्रमाणे प्रशिक्षणार्थी हे आपल्या कुटुंबामध्ये समाजामध्ये जाऊन याची माहिती सर्व नवीन नागरिकास नवीन विद्यार्थ्यांना देण्यासंबंधी सूचना श्री नदाफ यांनी सांगितले जेणेकरून आपल्या देशाचा पूर्व इतिहास नागरिकांना समजला पाहिजे त्याचे महत्त्व आपल्या सर्वांना ज्ञात असले पाहिजे याची जाणीव करून दिली सदर कार्यक्रमांमध्ये संस्थेचे शिल्पनिदेशक श्री घोडके सर सो गेजेले मॅडम श्री मंठाळे सर श्री कोणापुरे सर श्री लेंबे सर व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते सहकार्य कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे शिल्प निदेशका सौगवल मॅडम यांनी केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

राजू भाळे त्यांच्या टोळीवर वालचंदनगर पोलिसांनी लावला मकोका

सराईत गुन्हेगार राजू भाळे यांच्यासह तब्बल १३ जणांना विरोधात कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राजू भाळे टोळीवर वालचंदनगर पोलिसांनी लावला मोक्का पुण्याच्या इंदापूर आणि सोलापूरच्या माळशिरस परिसरात गेल्या काही दिवसांपासून दहशत वाजवणाऱ्या राजू भाडे टोळीवर वालचंद नगर पोलिसांनी मोक्का लावलाय. सराईत गुन्हेगार राजू भाळे यांच्यासह तब्बल १३ जणांना विरोधात कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी या कारवाईला मंजुरी दिली आहे. यातील सर्व आरोपी सध्या जेलमध्ये आहेत.

२७ फेब्रुवारी २०२५ रोजी इंदापूर तालुक्यातील निमसाखर येथे श्रेय वादातून उत्तम जाधव याचा निर्घृण खून झाला होता. या प्रकरणात आरोपी राजेंद्र उर्फ राजू महादेव भाळे आणि त्याच्या सहकाऱ्यांना वालचंदनगर पोलिसांनी अटक केली आहे.

वालचंदनगर पोलिसांनी राजू भाळे टोळीची दहशत मोडीत काढण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण

अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. टोळी प्रमुख भाळेसह १३ जणांविरोधात गुन्हे नोंदवले असून, धनाजी मसुगडे व निरंजन पवार यांच्यावर दुसऱ्यांदा मोक्का अंतर्गत कारवाई झाली आहे.

या टोळीतील आरोपींवर खून, मारहाण व दहशत माजवण्या सह इतर गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांची ही दहशत मोडीत काढण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी आता या राजू भाळे टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.

कोणा कोणावर लागला मोक्का...

१) राजेंद्र ऊर्फ राजु महादेव भाळे २) रामदास ऊर्फ रामा शिवाजी भाळे ३) नाना भागवत भाळे ४) निरंजन लहु पवार ५) तुकाराम ज्ञानदेव खरात सर्व इंदापूर तालुक्यातील खोरोची गावचे आहेत. ६) शुभम ऊर्फ दादा बापु आटोळे ७) अशोक बालु यादव ८) अक्षय भरत शिंगाडे तिघेही इंदापूर तालुक्यातील शेळगावचे आहेत.

पुण्याच्या इंदापूर आणि सोलापूरच्या माळशिरस परिसरात गेल्या काही दिवसांपासून दहशत वाजवणाऱ्या राजू भाडे टोळीवर वालचंद नगर पोलिसांनी मोक्का लावलाय. सराईत गुन्हेगार राजू भाळे यांच्यासह तब्बल १३ जणांना विरोधात कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी या कारवाईला मंजुरी दिली आहे. यातील सर्व आरोपी सध्या जेलमध्ये आहेत.

२७ फेब्रुवारी २०२५ रोजी इंदापूर तालुक्यातील निमसाखर येथे श्रेय वादातून उत्तम जाधव याचा निर्घृण खून झाला होता. या प्रकरणात आरोपी राजेंद्र उर्फ राजू महादेव भाळे आणि त्याच्या सहकाऱ्यांना वालचंदनगर पोलिसांनी अटक केली आहे.

वालचंदनगर पोलिसांनी राजू भाळे टोळीची दहशत मोडीत काढण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. टोळीप्रमुख भाळेसह १३ जणांविरोधात गुन्हे नोंदवले असून, धनाजी मसुगडे व निरंजन पवार यांच्यावर दुसऱ्यांदा मोक्का अंतर्गत कारवाई झाली आहे.

या टोळीतील आरोपींवर खून, मारहाण व दहशत माजवण्यासह इतर गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांची ही दहशत मोडीत काढण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी आता या राजू भाळे टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.

कोणा कोणावर लागला मोक्का...

१) राजेंद्र ऊर्फ राजु महादेव भाळे २) रामदास ऊर्फ रामा शिवाजी भाळे ३) नाना भागवत भाळे ४) निरंजन लहु पवार ५) तुकाराम ज्ञानदेव खरात सर्व इंदापूर तालुक्यातील खोरोची गावचे आहेत. ६) शुभम ऊर्फ दादा बापु आटोळे ७) अशोक बालु यादव ८) अक्षय भरत शिंगाडे तिघेही इंदापूर तालुक्यातील शेळगावचे आहेत. ९) स्वप्नील बबन वाघमोडे, रा. रेडणी, ता. इंदापुर १०) मयुर ऊर्फ जिजा मोहन पाटोळे, रा. निमसाखर, ता. इंदापुर ११) धनाजी गोविंद मसुगडे, रा. मौजे कारुंडे, ता. माळशिरस, जि. सोलापुर १२) सोमनाथ बबन पवार रा. कळंब, ता. इंदापुर, जि. पुणे आणि १३) सनि विलास हरिहर, रा.अंथुर्णे शेळगांव, ता.इंदापुर अशा तेरा जणांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजू महादेव भाळे व त्याच्या टोळीचे गुन्हेगारीचे पूर्व रेकॉर्ड पाहता आरोपी राजेंद्र भाळे याचेवर एकुण १२ गुन्हे, तसेच आरोपी रामदास भाळे, स्वप्नील वाघमोडे, मयुर ऊर्फ जिजा पाटोळे, अशोक यादव, सनि हरिहर यांचेवर प्रत्येकी ०२ गुन्हे, तर तुकाराम खरात, धनाजी मसुगडे, नाना भाळे याचेवर प्रत्येकी ०३ गुन्हे व निरंजन पवार याच्यावर ०५ गुन्हे दाखल असण्याचे पोलीस तपासात समोर आले.

तर धनाजी गोविंद मसुगडे व निरंजन लहु पवार यांचेवर या अगोदर वालचंदनगर पोलीस स्टेशन व दहिवडी पोलीस स्टेशन, सातारा यांनी सन २०१२ व २०१९ मध्ये मोक्का (मकोका) कायद्यांतर्गत कारवाई केली असुन सदर दोन्ही आरोपींवर दुसऱ्यांदा मोक्का (मकोका) अंतर्गत कारवाई झाली आहे.

प्रभारी पोलिस अधिकारी राजकुमार डुणगे प्रस्ताव ठरला महत्त्वाचा...

राजू भाळे टोळीची संघटित गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी वालचंदनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजकुमार डुणगे यांनी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांकडे महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाईसाठी प्रस्ताव सादर केला होता. यास पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी सहमती देत हा प्रस्ताव पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनील फुलारी यांकडे पाठवला. त्यास सुनील फुलारी यांनी मंजुरी दिली असून उत्तम जाधव यांच्या खून प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड करत आहेत.

सदरची कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी राजकुमार डुणगे, पोलीस उपनिरीक्षक मिलींद मिठापल्ली, स्था. गुन्हे शाखाचे महेश बनकर व वालचंदनगर पोलीस स्टेशनचे अभिजीत कळसकर, शैलेश स्वामी, गुलाबराव पाटील,जगदीश चौधर, विक्रमसिंह जाधव, गणेश वानकर व कोर्ट अंमलदार प्रेमा सोनावणे, सचिन खुळे यांनी पार पाडली आहे.

माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांनी साजरा

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष कै. नारायण धोत्रे यांचे चिरंजीव दत्तात्रय धोत्रे व धोत्रे परिवाराच्या वतीने पंढरपुरातील मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला २८० गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व एक डझन वह्या वाटप करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनव अक्कॅडमीचे संचालक मंदार केसकर होते. मुख्याध्यापक विजय वेरूळकर यांनी प्रचालीची माहिती व कार्याची ओळख करून दिली संस्थेचे मार्गदर्शक सदस्य दिलीपराव पाचंगे यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार परिचय व कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला यावेळी दत्तात्रय धोत्रे वैभव जोशी ह्या उपवळे राम चंद्र धोतने कलाशिक्षक सागर पाटसकर सूत्रसंचालन विश्वकुमार घोडके प्राचार्य सर्व विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे आवडेवे अक्कॅडमी संचालक मतदार केसकर बोलताना म्हणाले की, राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या वास्तुत त्यांच्या आईच्या नावाने १९६२ स*** उभारलेल्या मातोश्री सखुबाई कन्या प्रशालेच्या प्रांगणात राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या समाजात कोणतेही कार्यकर्त्यांना निस्वार्थीपणे गर्भुंना मदत काटकसरीने ओवा राहणाऱ्या सर्व संस्था हा विचार यावर एक बोधकथा सांगून विद्यार्थिनीची संवाद साधता आला माझे वडील कैलासवाची मार्तंड केसकर यांचा एक मुद्रक या नात्याने प्रशालीची अत्यंत स्नेह होता तो स्नेह आजच्या प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त चे कार्यक्रमामुळे माझ्यापर्यंत वृद्धीकरण झाला असे ते विद्यार्थी विद्यार्थिनींना संबोधित करताना आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाप्रसंगी प्रशालीचे प्रेरणादायी कार्य करणारी माजी मुख्याध्यापक जीवन पाटील, कैलासवासी सुभाष पाटसकर, कैलासवासी पुध आटपाडीकर सर यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे विद्यार्थ्यांचे मंत्रिमंडळाची स्थापना

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचालित वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल निफाड येथे इयत्ता १ली ते १०वी च्या विद्यार्थ्यांचे विद्यार्थीमंत्रिमंडळ मतदान प्रक्रियेनुसार मंत्रिमंडळाची स्थापना करून आज दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी विद्यार्थ्यांचा शपथविधीचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात प्रसंगी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे , श्री. ड उगावकरआप्पा , श्री. सचिव वडघुले तात्या, श्री. वाघावकर श्री. राठी , श्री. सोनी , . श्री. किरण कापसे, . श्री. राऊत तात्या, . श्री. विश्वास कराड श्री कुयटे श्री. नांदे तसेच वैनतेय विद्यालयाचा प्राचार्य सौ. गुजराती ,प्राथमिक विद्यामंदिर च्या प्राचार्या सौ.तनपुरे , व इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या सौ सानप उपस्थित होते. विद्यार्थी मंत्रिमंडळात पंतप्रधान, राष्ट्रपती ,आरोग्यमंत्री , शिक्षण मंत्री,क्रीडामंत्री अशा विविध मंत्रिपदांची खाती व त्यांचे प्रमुख मंत्री यांची नेमणूक मतदाना प्रक्रियेद्वारे करण्यात आली व विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन माझ्यावर दिलेली कामाची जबाबदारी प्रामाणिकपणे, स्वीकारून ती पूर्ण करण्यासाठी मी नियमबद्ध राहील.अशी शपथ विद्यार्थी मंत्र्यांनी घेतली तसेच याकार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद सर्व विद्यार्थी पालक वर्ग देखील उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त पडघे विभागात ज्यूसचे वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो आणि आपल्या हातातून नेहमीचं सामाजिक कार्य घडत रहावं, गरजवंतांना मदतीचा हात मिळावा या भावनेने आणि ७९ स्वातंत्र्य दिनानिमित्त भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर बोरीवली मराठी शाळा, आनंदनगर आदिवासी पाड्यातील मराठी शाळा, समतानगर ,पडघा अंगणवाडी येथील विद्यार्थ्यांना साई आधार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष शिवरूपानंद स्वामीजी यांच्या तर्फे ज्यूसचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. तर विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी पडघे परिसरातील युवक उपस्थित होते.

डिकसळ परिसरात बिबट्याचा धुमाकूळ, ...प्रशासन मात्र बसले डोळे झाकून

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

इंदापूर आणि दौंड या दोन तालुक्याच्या सीमेवर डिकसळ व राजेगाव हद्दीत गेले महिने दोन महिन्यापासून बिबट्याने धुमाकूळ घातला असून चार-पाच वस्तीवरील जनावरांवर त्यांनी हल्ला केला होता.

मागील चार दिवसापूर्वी प्रमोद जाधव यांच्या गुराच्या गोठ्यातील वासरावर हल्ला केला होता. आज उत्तम पोंदकुले यांच्या गुरांच्या गोठ्यावरील दोन जनावरांवर हल्ला केला. त्यातील एक वासरु मृत्यू पडले असून दुसरे वाजरु सुद्धा अखेरची घटका मोजत आहे.

हल्ला करणारा प्राणी हा बिबट्याच असल्याचे येथील शेतकरी ठामपणे सांगत आहेत. प्रशासन मात्र या गोष्टीकडे गांभीर्याने घेताना दिसत नाही. एखादी मोठी दुर्घटना घडल्यावर प्रशासनाला जाग येणार का असा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे. पाहुयात यावरती प्रशासन काय निर्णय घेणार?

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने विविध उपक्रम

उपक्रमास विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पंढरपूर : हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' अभियानांतर्गत पंढरपूर नगरपरिषदेने विविध शाळांमध्ये तिरंगा राखी, तिरंगा रांगोळी स्पर्धा, माझे संविधान निबंध स्पर्धा, समूह गीत गायन स्पर्धा उपक्रम राबवीत नागरिकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान सार्वजनिक स्वच्छतेबाबत जागृती निर्माण केली. या उपक्रमास पंढरपूर शहरातून विद्यार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची भावना, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. तसेच चित्रकला, तिरंगा राखी, तिरंगा रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यात पंढरपूर शहरामधील सर्व १५ शाळांमधील १ हजार २८९ विद्यार्थी, ६७ शिक्षक व नागरिकांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर हस्ताक्षर व माझे संविधान या विषयावर स्पर्धेचे आयोजन केले होते तसेच समूहगीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आली या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत महिला बचत गट (एसएचजी) करिता क्षमता बांधणी या घटका अंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली यामध्ये स्वच्छतेचे महत्व पर्यावरण जनजागृती टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे याची मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ५० बचत गटातील महिलांनी सहभाग नोंदविला. तसेच नगरपालिका कर्मचाऱ्यांनी यमाई तलाव या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली, नागरिकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी शहरात विविध ठिकाणी तिरंगा कॅन्व्हॉसची व सेल्फी पॉईंट व्यवस्था करण्यात आली यामध्ये शहरातील नागरिक हे कोणत्याही भारतीय भाषेत घरोघरी तिरंगा, हर घर तिरंगा किंवा जय हिंद लिहू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली,शहरातील मध्यवर्ती ठिकाणी मोबाईल शॉपी मध्ये बचत गटातील महिलामार्फत तिरंगा विक्री स्टॉल उभारण्यात आला आहेत त्यामधून नागरिकांना झेंडे उपलब्ध होतील, तसेच छत्रपती शिवाजी चौक येथे तिरंगा मेलाचे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी स्वातंत्र्य दिनी आवश्यक विविध वस्तूंची विक्री करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

श्रद्धेचे प्रतीक असलेल्या कावड यात्रेला आमदार मनोज भाऊ कांयदे यांची उपस्थिती

टाकरखेड भागिले ते धोत्रा नंदई तिसऱ्या सोमवारी शिवभक्तांच्या जल्लोषात भव्य कावड यात्रा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : श्रावण महिन्यात भगवान भोलेनाथाच्या भक्तीत रंगलेला कावड यात्रांचा माहोल सध्या महाराष्ट्रभर दिसत असून याच पार्श्वभूमीवर स्व.देवानंद कायंदे यांच्या स्मृति प्रित्यर्थ रवि भाऊ लाड, विकास नागरे सह दिपक चेके यांच्या पुढाकाराने दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी टाकरखेड भागिले येथून सुरुवात झालेली भव्य कावड यात्रा भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहात पार पडली. 'बोल बम', 'हर हर महादेव'च्या गजरात शेकडो शिवभक्तांनी पवित्र जल धोत्रा नंदई येथील प्राचीन महादेव मंदिरात वाहून भगवान शिवाच्या अभिषेकासाठी ही यात्रा पूर्ण केली.यात्रेचा मार्ग टाकरखेड भागिले, देऊळगाव मही, सरांबा फाटा, वाकी खुर्द फाटा मार्गे जात धोत्रा

नंदई येथील प्राचीन पुरातन महादेव मंदिरापर्यंत होता. या मार्गात स्थानिक ग्रामस्थांनी यात्रेतील शिवभक्तांचे स्वागत केले.पारंपरिक वेशभूषा,भगवे झेंडे, ढोल-ताशांच्या तालावर नाचणारे युवक आणि भक्तिगीतांच्या स्वरांनी वातावरण पूर्णपणे भक्तिमय बनले होते.टाकरखेड ते धोत्रा नंदई पर्यंत कावड धारकासाठी अनेकांनी चहा, फराळाची व्यवस्था केली होती, कावड यात्रा धोत्रा नंदई गावामध्ये पोहचताच गावातील सर्व मुख्य रस्तावर महिलांनी रांगोळी काढून गावामध्ये ठीक ठीक ठिकाणी कावड यात्रेचे महिलांकडून पूजन करण्यात आले.पोलिसांच्या विशेष सहकाऱ्याने कावड यात्रा कोणतीही अनुचित प्रकार न घटता संपन्न झाली.श्रावण महिन्यात महाराष्ट्र सह खेडो पाडी कावड यात्रांचा उत्साह असतोच, परंतु मोठी गर्दी पाहता सुरक्षेच्या दृष्टीने सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज कायदे यांनी यात्रेला दोन घंटे कावड यात्रेत सहभाग नोंदवून शिवभक्तांच्या मनामध्ये नव चैतन्य निर्माण केले पोलीस विभाग आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी यात्रेत सहभागी होणाऱ्या भक्तांच्या सोयी-सुविधा,पाणी व वैद्यकीय सुविधा यांची काळजी घेतली.

कावड यात्रा ही केवळ धार्मिक परंपरा नसून भारतीय संस्कृती, एकात्मता आणि भक्तीचे प्रतीक असल्याचे दर्शन या यात्रेतून घडले.विविध वयोगटातील लोक, महिला, तरुण आणि वयोवृद्ध एकत्र येऊन भगवान शंकराच्या भक्तीत लीन झाले. पुढील वर्षी सुद्धा नवीन जोशाने कावड यात्रेचे आयोजन करू असे रवि भाऊ लाड, दीपक चेके, विकास नागरे, मयूर गिते यांनी दिव्य दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क च्या प्रतिनिधीने संवाद साधला असता त्या सर्वांनी आश्वासन दिले. तसेच सर्व कावड यात्रेत सहभागी असलेल्याशिवभक्त, ग्रामस्थ, सामाजिक, राजकीय, पोलिस प्रशासनसह सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांनी आभार मानले.

थोडक्यात...

दुकानाजवळून निघून जा म्हटल्याने मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : विनाकारण शिवीगाळ करत फिर्यादी यांना दुकानाजवळ निघून जा असे म्हटल्याचा राग मनात धरून दुकानात असलेली शाळेची पत्र्याची

पाटी उजव्या कपाळावर मारून दुखापत केल्याप्रकरणी केल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी सकाळी पावणे बारा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी पूजा गिरीधर वाघमारे (रा. नालंदा नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून धानुश्री प्रभाकर शिवशरण (रा.आंबेडकर नगर) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार शेख हे करीत आहेत.

मोबाईल घेण्यावरून डोळ्यावर मारूण केली दुखापत

सोलापूर, (प्रतिनिधी) : माझा मोबाईल कोण घेतला असे म्हणून तरुणास शिवीगाळ करून डोळ्यावर गंभीर दुखापत केल्याची घटना १२ ऑगस्ट रोजी सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या दरम्यान रेल्वे कॉलनी येथे घडली.याप्रकरणी शाहिद फिरोज पठाण (वय-२१,फॉरेस्ट) याने सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून मोनू पवार (रा.मोदी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या ओळखीचा वरील संशयित आरोपी हा फिर्यादी जवळ येऊन माझा मोबाईल कोण घेतला असावा असे म्हणून शिवीगाळ करत फिर्यादीच्या डोळ्यावर मारून गंभीर दुखापत करत कायमस्वरूपी डोळा निकामी केला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे हे करीत आहेत.

मावा खाण्यासाठी पैसे न दिल्याने डोक्यात घातला दगड

सोलापूर (प्रतिनिधी) मावा खाण्यासाठी पैसे न दिल्याने डोक्यात दगड घालून जखमी केल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वा सात वाजण्याच्या दरम्यान जुना पुना नाका येथे घडली.याप्रकरणी रतन सोमनाथ माटे (रा.भवानी पेठ,मड्डी वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून राहुल राम सरवदे (रा.शांतीनगर,मड्डी वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे जुना तुळजापूर नाका ब्रिज जवळ थांबले असता, त्यावेळी वरील संशयित आरोपी हा दारू पिऊन येऊन तू मला दहा रुपये मावा खाण्यासाठी दे असे म्हणू लागला.त्यावेळी फिर्यादी त्यास पैसे नाहीत असे म्हणाले असता,तू मला पैसे देतो की नाही असे म्हणून दमदाटी करत रस्त्याच्या कडेला पडलेला दगड घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलिस हावलदार साळुंखे हे करीत आहेत.

पंढरपूरात तिरंगा बाईक रॅलीतून देशभक्तीचा जागर

तालुका प्रशासनाकडून आयोजन; नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : नागरिकांमध्ये राष्ट्राभिमान, देशभक्ती निर्माण व्हावी तसेच भारतीय स्वातंत्र्याचा ज्वाजल्य इतिहासाचे सर्व नागरिकांना स्मरण व्हावे, या उद्देशाने शासनामार्फत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. तिरंगा हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचे प्रतीक असल्याने पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने शहरातून तिरंगा बाईक रॅली काढून देशभक्तीचा जागर करण्यात आला.

यावेळी आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे , तहसिलदार सचिन लंगुटे यांनी हिरवी झेंडी दाखवून तिरंगा रॅलीला रवाना केले.सदर तिरंगा बाईक रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरु झालेली बाईक रॅली चौफाळा - नाथ चौक - तांबडा मारुती - महाद्वार - कालिका माता मंदिर - काळा मारुती चौफाळा मार्गे येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप करण्यात आला. ;यावेळी रॅलीत विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या.

सदर रॅलीमध्ये आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे , तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, शहर पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, तालुका पोलीस निरिक्षक टी.वाय.मुजावर तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

भिवंडीतील अंजुरफाटा चिंचोटी रस्ता बनला मृत्यूचा सापळा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

भिवंडी,अंजुर फाटा चिंचोटी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागासह शासकीय यंत्रणांचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे या रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली असून खड्डे रस्ता प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे.

या रस्त्यावर सुप्रीम इन्फ्रा स्ट्रक्चर कंपनीकडून टोल वसुली करण्यात आली होती, मात्र रस्त्याची योग्य देखभाल दुरुस्ती न केल्याने सुप्रीम कंपनीला टोल बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.मागील महिनाभरापासून टोल वसुली बंद असल्याने या रस्त्यावर ना कंपनीचे, ना सार्वजनिक बांधकाम विभागाचे असे कोणाचेही लक्ष नाही. त्यामुळे रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. अंजुर फाटा जवळील ७२ गाळा ते कालवार तसेच खारबाव च्या पुढे रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत.

विशेष म्हणजे ठाणे घोडबंदर रस्त्याच्याया दुरुती कामासाठी अवजड वाहनांना याच रस्त्यावरून प्रवेश दिला जात असल्याने या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित चिंचोटी अंजुर फाटा ते मानकोली याचबरोबर भिवंडी वाडा रस्ता येत असून सध्या हे दोन्ही रस्ते न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने या रस्त्यांवर शासनामार्फत अथवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोणतेही दुरुस्ती करता येत नाही अशी प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाचे भिवंडी उप अभियंता दत्तु गीते यांनी दिली आहे.

जवळगा वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील जवळगा पोमादेवी वाडी येथे गेल्या १८ वर्षापासुन अविरत पणे पारंपारीक अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली असुन या सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी जवळगा वाडी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात भाविकांची गर्दी होत मोठ्या उल्लासात असंख्य भाविकांच्या उपस्थीतीत हा अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो सप्ताहात काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन .महिला हरिपाठ व सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे ,आज विठ्ठल रुक्मिनी पुजन करुन सप्ताहाला सुरुवात करण्यात आली. यावेळी जवळगा पोमादेवीचे सरपंच सुजाता बनसोडे, उपसरपंच निलेश काकडे,

मा.सरपंच आमोल पाटील, सदस्य संगिता काकडे, .महादेव काकडे .श्रीराम शिंदे .गोविंद काकडे, महैश काकडे, सचिन पाटील, आशोक काकडे, बिभीषण जावळे, दत्तु निकम पुजारी, दादासाहेब कोव्हाळै ,राजेंद्र फडणीस. दत्ता कोव्हाळे, विष्णुकांत काकडे, समाधान काकडे, बलभिम शिंदे,तानाजी काकडे, पार्वती निकम, सुसाबाई जावळे, राजाबाई काकडे, पद्मीनबाई शिंदे, मथुराबाइ काकडे, राम निकम, महादेव पाटील, बब्रुवान पाटील, दिलीप पाटील, तानाजी काकडे, जनक शिंदे, डॉ. व्यंकटराव पाटील, राजेंद्र कोव्हाळे, गोविंद शिंदे, विलास पाटील ,शेषेराव कोव्हाळे, श्रीहरी उमाटे, नंदकिशोर माळी, मोहन मंगरुळे, दादासाहेब मुळे, हनमंत शिंदे, वसंत निकम .रतन निकम .आन्नाराव कोव्हाळे, सह गावातील भजनी मंडळ व जवळगा पो.वाडी ग्रामस्थ उपस्थीत होते.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना थेट डी.बी.टी साठी आधार नोंदणी शिबीर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/जिमाका : संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०२४ पासून संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ डी. बी. टी. प्रणाली व्दारे देण्याचे ठरविले आहे. त्याकरिता सर्व लाभार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर नोंदणी व आधार प्रमाणीकरण करुन घेणे आवश्यक आहे. डीबीटी पोर्टलवर आधार नोंदणी न झालेल्या लाभार्थ्यांसाठी संजय गांधी निराधार योजना शहर कार्यालय, सोलापूर यांचेवतीने दि.१८ ऑगस्ट २०२५ ते २३ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विशेष शिबिराचे आयोजन करणेत आले आहे. सदर शिबिरामध्ये संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांनी बँक पासबुक, आधार कार्ड, मोबाईल नंबर इ. आवश्यक कागदपत्रांसह खालील नमूद ठिकाणी सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत उपस्थित राहून लाभार्थी यांनी आपले आधार नोंदणी व प्रमाणीकरण करुन घ्यावे, असे आवाहन तहसिलदार शिल्पा पाटील (संगांयो शहर कार्यालय सोलापूर) यांनी केले आहे.

शिबीराचे ठिकाण व दिनांक

१८ ऑगस्ट. २०२५ रोजी - विरशैव ककैय्या समाज मंदीर, ढोर गल्ली , व पंचमुखी हनुमान मंदीर वालचंद गेट समोर

१९ ऑगस्ट. २०२५ रोजी - विरशेव ककैय्या समाज मंदीर, ढोर गल्ली , व दत्त चौक, दाजी पेठ राममंदीर सोलापूर रुग्णालयशेजारी

२० ऑगस्ट. २०२५ रोजी- विरलिगेश्वर समाज मंदीर घोंगडे वस्ती, सोलापूर, व महानगरपालिका कॅम्प शाळा, लष्कर

२१ ऑगस्ट. २०२५ रोजी- विरलिंगेश्वर समाज मंदीर घोंगडे वस्ती, सोलापूर, व सिध्दगणेश हनुमान मंदीर, भारतरत्न इंदीरा नगर.

२२ ऑगस्ट. २०२५ रोजी- मडिवाळेश्वर माचदेव परीट जाती मंडळ ट्रस्ट कन्ना चौक, व अष्टभुजा देवी मंदीर मोदीखाना.

या ठिकाणी लाभार्थ्यांनी आधार नोंदणी व प्रमाणीकरण करावे ,जे लाभार्थी आवश्यक कागदपत्रे जमा करणार नाहीत ते लाभार्थी अनुदानापासून वंचित राहतील याची नोंद घ्यावी. असे आवाहन संजय गांधी निराधार योजना शहर कार्यालय, सोलापूर यांचेकडून करण्यात येत आहे.

गोकुळाष्टमीनिमित्त श्री संत श्रेष्ठ श्री ज्ञानदेवाची ७५० वी जयंती भक्तिभावाने उत्साहात साजरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या वतीने शासकीय आदेशाने प्रसिद्धी पत्रकार शासनाच्या वतीने प्रत्येक सहकारी, व खाजगी संस्थेत श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची जयंती सन २०२५ हे वर्ष सुवर्ण महोत्सवी म्हणून साजरे करण्यात यावे या अनुषंगाने पंढरपूर नगरी परिषदेकडून श्री संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा व मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून हा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी दिली माहिती

त्यानिमित्त शहरातील वारकरी फडकरी तसेच शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, विविध मठाचे मठाधिपती शाळेंमधील विद्यार्थी, नगरपरिषद कर्मचारी व पंढरपूर शहरातील, तिच्यासह शहरातून दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी नगर प्रदेशांना टाळ मृदंगाच्या घोषणा भजन व हरिनाम जप घेत करण्याची नियोजन केले आहे.

सदर दिंडी श्री संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज मठ नाथ चौक येथून सायंकाळी पाच वाजता निघणार आहे तरी सदर दिंडीमध्ये पंढरपूर शहरातील जास्तीत जास्त लहान थोर नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आव्हान पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी श्री महेश रोकडे यांनी केले आहे.

जागृत रहा, सुरक्षित रहा उपक्रमांतर्गत डिजिटल व्हॅनद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पडघा विभागात ठाणे ग्रामीण पोलिसांतर्फे शाळांमध्ये जनजागृती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

ठाणे ग्रामीण पोलिसांनी ठाणे जिल्ह्यातील शाळांमध्ये जनजागृती मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत

भिवंडी तालुक्यातील पडघा विभागात विविध शाळेमध्ये जाऊन मुलांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढीस लागावी यासाठी विविध उपक्रम राबवले गेले आहेत. या जनजागृती मोहिमेत पोलिसांनी मुलांशी संवाद साधणे,त्यांना कायदेशीर माहिती देणे, आणि सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांचा सुरक्षित वापर कसा करायचा याबद्दल माहिती पोलिस देत आहेत.त्याच अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील शारदा विद्यालय पडघे, जिल्हा

परिषद समतानगर बोरीवली, के. एम.ई.एस उर्दू हायस्कूल, शेरेकर पाडा शाळा, शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वांद्रे, सौरगाव नाका,पडघे नाका येथे डिजिटल व्हॅन द्वारे सुरक्षिततेची भावना वाढवण्यासाठी समुपदेशन, कायदेशीर मार्गदर्शन, बालविवाह, महिला अत्याचार, सायबर गुन्हे आणि रस्ते सुरक्षा याबद्दल डिजिटल व्हॅनच्या माध्यमातून व्हिडिओद्वारे विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी ठाणे ग्रामीण पोलिसांनी एक फिरती डिजिटल व्हॅन तयार केली असून शाळा, आश्रमशाळा, कॉलेज आणि आदिवासी वाड्यांमध्ये जाऊन मुलांना मार्गदर्शन करत आहेत. त्यामध्ये समुपदेशन सत्र,सोशल मीडिया मार्गदर्शन आणि इतर माध्यमांचा सुरक्षित वापर कसा करावा, याबद्दल पोलिसांच्या माध्यमातून मुलांना मार्गदर्शन केले जात आहे. या उपक्रमांमुळे मुलांना सुरक्षिततेची जाणीव होईल आणि त्यांचे भविष्य सुरक्षित होईल, अशी पोलिसांची अपेक्षा आहे, असे ठाणे ग्रामीण पोलिसांच्या संकेतस्थळाने म्हटले आहे. सदर उपक्रम ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस.स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून सदर पडघा विभागात पडघा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक,जितेंद्र ठाकूर यांच्या अधिपत्याखाली पडघा पोलिस स्टेशनचे पोलिस हवालदार शांताराम सरवदे, तसेच महिला पोलीस रेश्मा गोरले ,पोलिस हवालदार श्रीधर औटी, पोलिस हवालदार शशिकांत पाटील, महिला पोलीस भागश्री कोगेरे ,पोलिस शिपाई विकास डिगे

उपक्रमात सहभागी झाले होते.

डेक्कन एजुकेशन सोसायटी पुणे येथे संस्थापक दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे

डेक्कन एज्युकेशन सोसायटी टेकनिकल इन्स्टिटयूट पुणे येथे दि. ९ ऑगस्ट रोजी संस्थापक दिन साजरा करण्यात आला त्या प्रसंगी सोसायटीचे संस्थापक बाळ गंगाधर टिळक, गो. ग. आगरकर, व्ही. चिपळूणकर, ना. म. जोशी आणि वामनराव आपटे यांची स्मृती आठविण्यात आली तसेच तसेच २०२४-२५ बॅचमधील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला त्यामध्ये

प्रथम -प्रकाश अनिल शिंदे

द्वितीय - नारायण पावसे

तृतीय - सुधीर माने

प्रामुख्याने यांचा समावेश आहे.

तसेच माझी विद्यार्थ्यांचा पण सत्कार करण्यात आला, डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना ते १५० वर्षाचा इतिहास यावर व्याख्याते व इतिहासतज्ज्ञ श्री. योगेश पाटील सर यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व टिआयपीचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन श्री. खेमराज रणपिसे सर व कॉलेजचे संस्थाप्रमुख डॉ. रविप्रकाश डोंगरे सर यांनी आपले विचार मांडले, या प्रसंगी विध्यार्थ्यांच्या वतीने श्री प्रकाश शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. ऋतुजा मॅडम यांनी केले. अभ्यासक्रम समन्वयक श्री. प्रशांत कोंडे सर प्रा. गणेश झाडे सर.प्रा. नाना सातपुते सर यांनी आभार मानले, या वेळी पुर्ण स्टाफ व आजी माजी विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.